रुबिक क्युब सोडवा

सचिन तोडकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

रुबिक क्युब सोडवा

(अभ्यास)

लेखक : सचिन भानुदास तोडकर

रुबिक क्युब सोडवा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे खर्च झाले आहेत.

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

हे पुस्तक वाचून झाल्यावर

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

रुबिक क्युब सोडवा

लेखक - सचिन भानुदास तोडकर

ईमेल - nesgi.sbtodkar@gmail.com

संपर्क पत्ता : अ-५, /३०३ , सह्याद्री सिटी , नसरापुर , ता. भोर , जि . पुणे , पिन. ४१२२०५

फोन नं. : ९७६४९१०७४४

ब्लॉग: (https://wordpress.com/home/mechatronicsmadeeasy.wordpress.com)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १० एप्रिल २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

नाव: सचिन भानुदास तोडकर

लेखक हे अभियांत्रिकी क्षेत्रामध्ये पदव्युत्तर असून पुणे विद्यापीठ अंतर्गत एका अभियांत्रिकी महाविद्यालयात गेली आठ वर्ष कार्यरत आहेत.

यापूर्वी त्यांनी 'Mechatronics' या यंत्र अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमाचे पुस्तक लिहिले आहे. मराठीमधे प्रथमच "शिका बुद्धिवर्धक रुबिक घन " या पुस्तकाद्वारे त्यांची सुरुवात आहे.

लेखकाने आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत ' करियर मार्गदर्शक ' , समुपदेशक , बाल मानसशास्त्र , इत्यादी विविध क्षेत्रात अभ्यास केला असून आत्ता ते ' डर्माटोग्लायफिक्स' (DMIT) अर्थात बोटांच्या ठश्यावरुन विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांची ओळख करून त्यांच्या जीवनात यशस्वी होण्यासंदर्भात मार्गदर्शन करतात.

संपर्क पत्ता : अ-५, /३०३ , सह्याद्री सिटी , नसरापुर , ता. भोर , जि . पुणे , पिन. ४१२२०५

फोन नं. : ९७६४९१०७४४

ब्लॉग: (https://wordpress.com/home/mechatronicsmadeeasy.wordpress.com)

nesgi.sbtodkar@gmail.com

प्रस्तावना

फेब्रुवारीचा शेवटचा आठवडा सुरू झाला भारतामध्ये "कोरोनाव्हायरस" दस्तक देऊ लागला. प्रत्येकाला आपल्या आरोग्याची काळजी वाटत असतानाच मला मात्र वेगळी समस्या भेडसावत होती. माझा सात वर्षाचा श्लोक आता घराबाहेर खेळू शकणार नव्हता आणि घरात मला त्याला मोबाईल गेम खेळायला द्यायचा नव्हता.

विचार करता करता मला एक दिवस मॉलमध्ये एक अनोखे खेळणे सापडले. याच्यावर आमचा श्लोक खूप वेळ खेळू शकेल आणि त्याचा बौद्धिक विकास होईल याची मला खात्री पटली. पण मला कुठे खेळता येत होते हे खेळणे, म्हणजे ३* ३ चा रुबिक क्यूब.

मग माझी सुरुवात झाली हा खेळ आधी समजून घेण्यास. इंटरनेट, यूट्यूब, गुगल वरील किचकट माहिती समजून घेण्यास. हा प्रवास खूपच इंटरेस्टिंग होता. परंतु या विषयावर मराठीमध्ये एकही पुस्तक नाही हे पाहिल्यानंतर आपणच काहीतरी लिहावसं वाटलं आणि मग अगदी लहान मुलांनाही समजून सोडवता येईल असे मी पुस्तक लिहिलं.

याचा पहिला प्रयोग मी श्लोक वरच केला आणि त्याने फक्त चार दिवसांमध्ये रुबिक क्यूब सोडवायला सुरुवात केली. या अनुभवांची मला खूपच मदत झाली, कारण लहान मुलांना कसे समजून सांगावे याच्यासाठी घरातल्याच वाचकाची पहिल्यांदा मला मदत झाली.

हे पुस्तक मराठी वाचकांच्या नक्कीच पसंतीला पडेल आणि पुढच्या "लॉक डाऊन पिरियड" मध्ये एक बुद्धिवर्धक म्हणून लहान मुलांसाठी उपयोगी पडेल अशी मी अपेक्षा करतो.

अर्पणपत्रिका

लॉकडाऊन मुळे घरात बसून 'बैठे खेळ' खेळून कोरोना ला हरवणारा माझा मुलगा 'श्लोक' आणि त्याचासारखे असंख्य बालवीर जे न कंटाळता , पालकाना त्रास न देता , आपला संयम दाखवत आहेत त्या सर्वाना हे पुस्तक अर्पण .

सचिन भानुदास तोडकर

अनुक्रमणिका

क्र.		पान क्र.
१	ओळख रुबिक क्यूबची	९
२	पहिली पायरी- पिवळे डेज़ीचे फूल	१३
३	दुसरी पायरी- पांढरा अधिक (क्रॉस) तयार करणे	१५
४	पांढरी बाजू व पहिली ओळ पूर्ण करणे	१७
५	दुसरी ओळ पूर्ण करणे	१९
६	शेवटची ओळ पूर्ण करणे	२१

१ ओळख रुबिक क्यूबची

प्रसिद्ध शिल्पकार आणि आर्किटेक्चर चे प्राध्यापक “एर्नी रुबिक” यांनी आपल्या विद्यार्थ्यांना विविध भाग फिरवून वेगवेगळे आकार तयार करता येणारे एक शैक्षणिक रुबिक क्यूब हे ३-डी संयोजन कोडे बनवले. ते वर्ष होते १९७४.

हे त्रिमितीय कोडे काही वर्षातच इतके लोकप्रिय होईल असे त्यांना कदाचित स्वप्नातही वाटले नसेल त्यांनी त्याला “मॅजिक क्यूब” असे नाव दिले. १९८० साली “आयडियल टॉय कॉर्पोरेशन” या कंपनीने “एर्नी रुबिक” च्या परवानगीने त्याची विक्री सुरू केली आणि आश्चर्य म्हणजे, त्याच वर्षी “जर्मन गेम ऑफ द इयर” हा सर्वोत्कृष्ट कोड्याचा सन्मान या “मॅजिक क्यूब” ला मिळाला.

१९८० च्या दशकात रुबिक क्यूब मुख्य प्रवाहातील लोकप्रियतेच्या उंचावर पोहोचला असला, तरीही तो व्यापक प्रमाणात ज्ञात आणि वापरला जातो २००३ सालापासुन. रुबिक क्यूबच्या आंतरराष्ट्रीय प्रशासकीय मंडळाच्या “वर्ल्ड क्यूब असोसिएशन”ने जगभरात स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

रुबिकच्या घन (क्यूब) तुकड्यांची व्याख्या

१) **काठ तुकडे / Edge Pieces:** दोन (२) रंग असलेले तुकडे. मध्यम पंक्तींमध्ये बारा (१२) काठाचे तुकडे असतात.

२) **कोपरा तुकडे/ Corner Pieces:** तीन (३) रंग असलेले तुकडे. हे आठ (८)तुकडे नेहमी क्यूबच्या वरच्या आणि खालच्या पंक्तींमध्ये असतात.

३) **केंद्र तुकडे / Centre Pieces:** हे सर्वात महत्वाचे सहा (६) तुकडे आहेत. कारण त्यांना एकच रंग असतो. त्यांची जागा कधीच बदलत नाही. त्यामुळे त्यांना केंद्र ठेवून आपल्याला कोडे सोडवायचे आहे. प्रत्येक बाजूला मध्यभागी असे सहा केंद्रांचे तुकडे आहेत.



आकृती: पाश्चिमात्य रुबिकघन रंगसंगती

- पिवळ्या विरुद्ध पांढरा/ *WHITE opposite YELLOW*
- नारंगी विरुद्ध लाल/ *ORANGE opposite RED*
- निळ्याच्या विरुद्ध हिरवा / *GREEN opposite BLUE*

हे सेंटर पीस रंग नेहमी एकमेकांच्या विरुद्ध असतात.

घनची प्रत्येक बाजू एका अक्षर द्वारे दर्शविली जाते.

-  R(आर) = Right Face - घन च्या उजवीकडे
- L (एल) = Left Face – घनच्या डावीकडे

- U (यू) = Upper Face - घनच्या वरची बाजू
- D (डी) = Down face - घनच्या तळाची बाजू
- F (एफ) = Front Face - घनच्या समोरची बाजू
- B (बी) = Back Face - घनच्या मागील बाजूस

या अक्षराचा उपयोग करून आपण काही सुत्रे बनवणार आहोत. त्याचे काही नियम :

१) एका अक्षरासाठी एक चथुर्तांश (१/४) घड्याळाच्या दिशेने ती बाजू फिरवणे.

२) अक्षरापुढे २ असेल तर दोनदा ती बाजू फिरवणे.

३) अक्षरापुढे डॅश चिन्ह असेल तर एक चथुर्तांश (१/४) घड्याळाच्या विरुद्ध दिशेने ती बाजू फिरवणे.

२ पहिली पायरी- पिवळे डेज़ीचे फूल

मित्रांनो “मॅजिक क्यूब” सोडवायला सुरुवात कशी करायची असा प्रश्न तुम्हाला पडला असेल.

तर सुरुवात आपण पिवळ्या डेज़ी च्या फुलापासून करणार आहोत.

१) पिवळा केंद्र (सेंटर पीस) वरच्या बाजूला (Upper Face) घेऊन त्याच्या चारी बाजूला आपल्याला चार पांढरे काठ (White Edge pieces) आणायचे आहेत.

२) त्यासाठी चार पांढरे काठ (White Edge pieces) शोधून काढणे आणि त्यांना पिवळा सेंटरच्या जवळ आणून ठेवणे हे आपल्याला पाच ते सहा चालींमध्ये पूर्ण करायचे आहे.



३) वरील चित्रात दाखवल्याप्रमाणे पांढरे काठ आपण सहजतेने वरच्या बाजूस आणु शकतो.



४) असे पिवळे डेसिचे फूल तयार केले की आपली पहिली पायरी पूर्ण होते.

३ दुसरी पायरी- पांढरा अधिक (क्रॉस) तयार करणे

इथ एक गम्मत आहे. पांढरे काठ आपल्याला व्यवस्थित जुळवायचे आहेत.

सूत्र: ***U आणि F2***

१) रुबिक घनाच्या समोरचा (FRONT) चेहरा पहा.

२) वरचा पांढरा काठाची समोरची बाजू, केंद्राच्या रंगाशी जुळत नसेल तर, तोपर्यंत "U" फिरवा. असे झाल्यास, चरण ३ वर जा.

३) आता " F2" बनवा जेणेकरून आता पांढरा टाइल खाली असेल.

सर्व पांढऱ्या फरशा खालच्या बाजूवर येईपर्यंत या दोन चाली पुन्हा करा. आपला पांढरा क्रॉस प्रकट करण्यासाठी आपला घन फिरवा.

४ पांढरी बाजू व पहिली ओळ पूर्ण करणे

एकदा आपल्याला तळाशी व्हाइट क्रॉस आल्यावर पहिला स्तर पूर्ण करण्यासाठी आता फक्त चार कोपरे आवश्यक आहेत. त्यासाठी आपल्याला चार संभाव्य प्रकार पाहायला मिळतात.

पांढरे कोपर असलेला तुकडा

- खाली तोंड करून किंवा
- वर तोंड करून असू शकतो.
- समोरच्या किंवा
- डाव्या-उजव्या बाजूला असू शकतो.

१) आपला पांढरा क्रॉस खाली ठेवा

२) वर फेस असलेला पांढरा कॉर्नर पीस समोरच्या बाजूला आणण्याची प्रॅक्टीस करा.

३) एकदा कॉर्नर पीस समोर आला की आपण सूत्र वापरू शकतो.

४) .पांढरा रंग पाहून त्याला आपणास त्या दोन रंगांच्या मध्ये इच्छित स्थानाच्या वर आणायचे आहे. उदा. जर आपल्याकडे लाल / हिरवा सह कॉर्नर असेल तर लाल आणि हिरवा सेंटर दरम्यान जाण्याची आवश्यकता आहे.

५) पांढरा रंग डावीकडे असेल तर सुत्र: U’ L’ U L

६) पांढरा रंग उजवीकडे असेल तर सुत्र: U R U’ R’

- लवकरच आपण विचार न करता अंतर्ज्ञानाने कोपरे आणि कडा योग्य ठिकाणी पूर्ण करू शकाल. यालाच स्नायुची स्मरणशक्ती (Muscle Memory) म्हणतात.



- पहिली ओळ पुर्ण केल्यावर आपला घन असा दिसेल.

५ दुसरी ओळ पूर्ण करणे

पांढरी बाजू पूर्ण केल्यानंतर तिला खाली ठेवूनच दुसरी लेयर पूर्ण करायची आहे.

त्यामुळे पिवळा केंद्र (Yellow corner) वरच्या बाजूस असेल.

१) आता वरच्या ओळिमध्ये काठ तुकड्यामध्ये (Edge Piece) पिवळा रंग नाही ते शोधून काढायचे आहेत. यात आपण दोन प्रकार पाहू शकतो

अ) सर्व काठ तुकड्यामध्ये पिवळा रंग असेल .पहिल्या प्रकारामध्ये आपणास हवे असणारे काठ तुकडे (Edge Piece) दुसऱ्याओळी मध्ये परंतु चुकीच्या ठिकाणी किंवा चुकीच्या दिशेने असू शकतील त्यांना वरच्या बाजूला घेण्यासाठी आपण सूत्र वापरू शकतो..:

R U' R' U' F' U F

त्यानंतर आपण दुसऱ्या पायरीला येतो.

आ) एखादा काठ तुकडा आपल्याला पिवळा नसलेला सापडेल.

२) इथे आपण त्या काठ तुकडा (Edge Piece) रंग पाहून त्यांना केंद्र तुकड्याशी जुळवतो.

३) त्याच्या वरच्या बाजूला असलेला रंग पाहून आपणास दोन पैकी एक सूत्र वापरायचे आहे. वरचा रंग जर डाव्या केंद्राची जुळत असेल तर (1. a)

U' L' U L

U F' U' F

४) वरचा रंग तर उजव्या केंद्राची जुळत असेल तर (1. b)

U R U' R'

U’ F U F’

या पायऱ्या सर्व काठ योग्य ठिकाणी पोहोचेपर्यंत चार वेळा करावे लागतात आणि तुम्ही दुसरी ओळ सहज पूर्ण करू शकता.





(1.a)





(1.b)
symmetrical to (1.a)



दुसरी ओळ पुर्ण केल्यावर घन असा दिसेल.

६ शेवटची ओळ पूर्ण करणे

या पायरीमध्ये आपल्याला चार वेगवेगळी सूत्रे उपयोगात आणायची आहेत .

१) पिवळा अधिक (Cross) तयार करणे.



अ)

डॉट आ) उलटा एल इ) सरळ रेषा पिवळा अधिक

आपण कुठल्याही पायरीला असलात तरी एकच सूत्र <u>१ ते 3</u> वेळा वापरायचे आहे:



<u>F R U R' U' F'</u>

अ) एकदा सूत्र वापरल्यानंतर उलटा एल होतो.

आ) एक पिवळी बाजू तुमच्याकडे व दुसरी बाजू उजवीकडे ठेवून परत तेच सूत्र वापरा

इ) आता आपल्याला सरळ रेषा भेटेल पुन्हा ही सरळ रेषा आपल्याला डावी-उजवी अशी ठेवायचे आहे. परत ते सूत्र वापरायचे. शेवटी आपल्याला अधिक चिन्ह (Cross) मिळतो.

२) अधिक चिन्ह (Cross) चे काठ योग्य जागी बसवणे.

अधिक चिन्ह (Cross) मध्ये तीन प्रकार पहायला भेटतात

अ) दोन समोरचे काठ योग्य जागी असतील

आ) दोन शेजारचे काठ योग्य जागी असतील . { अ) प्रकार मधून आ) प्रकारामध्ये आल्यानंतर योग्य काठ डावीकडे पाठीमागच्या बाजूला ठेवायचे आहेत. }

इ) किंवा सर्व काठ योग्य जागी असतील.

इथेही आपल्याला एकच सूत्र वापरायचे आहे :



R U2 R' U'

R U' R' U'

सर्व काठ योग्य जागी आले की आपण तिसऱ्या भागाकडे वळू या

३) **कोपरे योग्य जागी आणणे** (इथे ओरिएंटेशन वेगवेगळे असू शकते)

यातही तीन प्रकार असू शकतात

अ) एकही कोपरा (Corner) योग्य ठिकाणी नसेल,

आ) एखादा कोपरा (Corner) योग्य ठिकाणी असेल (पहिल्यामधून दुसऱ्या केस मध्ये आल्यानंतर मात्र योग्य कॉर्नर उजव्या बाजूला ठेवायचा आहे).

पहिल्या दोन्हीत आपण एकच सूत्र ३ ते ४ वेळा वापरणार आहोत.

U R U' L' U R' U' L



किंवा

इ) सर्व कॉर्नर योग्य ठिकाणी असतील.

सर्व कोपरे योग्य ठिकाणी असतील त्यावेळी आपल्याला कॉर्नर पीस ओरिएंटेशन करायचे आहे.

४) कोपरे योग्य पद्धतीने वळवणे. (Corner Piece Orientation)

एक कोणतीही एक बाजू फिक्स समोर ठेवून जोपर्यंत कॉर्नर पीस योग्य मांडण्यात येत नाही तोपर्यंत एकच सूत्र वापरत राहणे .

R′ D′ R D



एक कोपरा योग्य झाल्यानंतर समोरची बाजू तीच ठेवून वरची बाजू फिरवून दुसरा कोपरा समोर आणणे आणि परत तेच सूत्र वापरणे असे सर्व कोपरे पूर्ण होईपर्यंत केले तर तुमचा रुबिक क्यूब पूर्ण झालेला दिसेल.



Appendix

२००३ पासून, स्पर्धेचा विजेता पाचपैकी तीनपैकी मधल्या तीन प्रयत्नांचा सरासरी वेळ घेऊन निश्चित केले जाते. तथापि, सर्व प्रयत्नांचा एकच सर्वोत्तम वेळ नोंदविला गेला आहे. वर्ल्ड क्यूब असोसिएशनने जागतिक विक्रमांचा इतिहास राखला आहे. २००४ मध्ये डब्ल्यूसीएने स्टॅकमॅट टायमर नावाचे विशेष वेळ उपकरण वापरणे बंधनकारक केले.

Top 10 solvers by average of 5 solves

Position	Name	Average	Nationality	Competition	Solves
1	Feliks Zemdegs	5.53	Australia	Odd Day in Sydney 2019	7.16 / 5.04 / 4.67 / 6.55 / 4.99
2	Max Park	5.59	United States	Houston Winter 2020	4.90 / 5.72 / 6.53 / 5.50 / 5.56
3	Sean Patrick Villanueva	5.98	Philippines	Marikina City Open II 2019	7.67 / 5.72 / 5.99 / 5.52 / 6.23
4	Philipp Weyer	6.06	Germany	Swisscubing Cup Final 2018	4.81 / 6.43 / 5.48 / 6.26 / 7.51
5	Tymon Kolasiński	6.12	Poland	PST CFL Częstochowa 2019	5.32 / 5.92 / 5.66 / 7.57 / 6.77
7	Patrick Ponce	6.13	United States	Liberty Science Center Open 2019	5.57 / 8.87 / 5.65 / 6.52 / 6.23
7	Lucas Etter	6.19	United States	Indianapolis Cubes 2019	7.34 / 5.42 / 5.81 / 5.30 / 9.33
8	Bill Wang	6.25	Canada	WCA World Championship 2019	6.81 / 6.65 / 5.99 / 5.76 / 6.12
9	Drew Brads	6.29	United States	Flag City Fall 2019	6.25 / 6.82 / 6.21 / 6.39 / 6.24
10	Leo Borromeo	6.37	Philippines	Bonifacio Memorial 2018	6.89 / 5.12 / 5.35 / 7.46 / 6.88

Ref: World Cube Association Official 3x3x3 Ranking Average

SHLOK DMIT

Dermatoglyphics Multiple Intelligence Test (DMIT)

"डर्माटोग्लाइफिक्स" हा फिंगरप्रिंट्स, हस्तरेखाच्या प्रिंटचा अभ्यास आहे. बोटाचे ठसे गर्भावस्थेच्या 13 व्या आठवड्यापासून तयार होतात आणि 21 व्या आठवड्याच्या शेवटी विकास पूर्ण करतात आणि नंतर अपरिवर्तित राहतात. **"डर्माटोग्लाइफिक्स"** विश्लेषण हे नवीन संगणक तंत्रज्ञानाचे आणि विज्ञान (मात्रात्मक विश्लेषण) चे मिश्रण आहे, फिंगरप्रिंट नमुन्यांची स्कॅनिंग आणि तुलना करून आपण जन्मजात गुणांचा शोध घेऊ शकतो आणि प्रत्येक व्यक्तीच्या स्वतःच्या वैशिष्ट्यांनुसार कोणत्याही पूर्वाग्रहाशिवाय सूचना देऊ शकतो. शिवाय, एखाद्याचे फिंगरप्रिंट कधीही संपूर्ण आयुष्यात बदलत नाहीत. प्रत्येकाची **"डर्माटोग्लाइफिक्स"** नमुना अद्वितीय आणि स्थिर आहे. **"डर्माटोग्लाइफिक्स"** तंत्रज्ञान आधारित एकाधिक बुद्धिमत्ता चाचणी (एमआयटी) हे जीवनाचे सत्य समर्थन करण्यासाठी विकसित केलेले एक उत्कृष्ट साधन आहे. या चाचणीद्वारे, एखाद्याचे स्वारस्य आणि त्यांची ताकद त्यांच्या दिशानिर्देशांचे अन्वेषण करू शकते.

एकाधिक बुद्धिमत्ता चाचणी (MIT), एक चाचणी जी आपल्याला आपल्या करियरच्या ध्येयामध्ये यशस्वी होण्यासाठी आपल्या लपलेल्या प्रतिभा आणि कौशल्याचा वापर, अभ्यास, विश्लेषण आणि वापरण्यात मदत करू शकते. आपल्या निसर्गाचे आणि मनोवृत्तीचे विश्लेषण करण्यासाठी डीर्माटॉलीफिक्सच्या क्रांतिकारक तंत्रज्ञानाचा वापर करणारी एक चाचणी.

अहवाल प्रकार	पृष्ठे	मूळ किंमत	सवलतीसह किंमत (प्रथम २५ रिपोर्ट)
मिनी डीएमआयटी	11	1000	800
एंटरप्राइज डीएमआयटी	35	3000	2600
प्रीमियम डीएमआयटी	55	4000	3200
प्रीमियम प्लस डीएमआयटी	77	5000	4000

"डर्माटोग्लाइफिक्स "चे विविध वयोगटासाठी होणारे फायदे

1. वयोगट 0-3 ◆ या वयात मुलाचा भावनाप्रधान विकास झपाट्याने सुरु होतो मेंदूची न्यूरॉन ऍक्टिव्हिटी जास्त असते. पालकाला आपल्या पाल्याचे Inborn Potential लवकरात लवकर माहित होणे आवश्यक असते म्हणजे त्यास अनुसरून पालकत्वाची शैली आणि शिक्षण देण्याची पद्दत याचा निर्णय घेऊन लवकरच सुरुवात करता येईल.
2. वयोगट4-12 ◆या वयोगटात चेतासंधीचे जाळे वेगाने वाढत असते अशा वेळेस पाल्यास आवश्यक गोष्टी देणे व अनावश्यक बाबी टाळणे याचे नियोजन करणे सोपे होते, पुढच्या वयोगटापेक्षा या वयोगटात जिज्ञासूवृत्ती, शिकण्याची,ज्ञान ग्रहण करण्याची क्षमता खूप असते या काळात शिकण्याची शैली आणि बुद्धिमत्तेचे क्षेत्र समजल्यास त्याने जास्त वेळ कोणत्या ऍक्टिवीटीवर द्यावा कोणते छंद जोपासवे हे समजते त्यामुळे मेंदूच्या सर्वांगीण विकासाचे मार्गदर्शन मिळेल.
3. वयोगट 13-25◆ पौगंडावस्थेत मुले जास्त आग्रही होतात स्वभान येऊ लागते त्यामुळे स्वतःचे व्यक्तिमत्व कोणत्या प्रकारचे आहे नैसर्गिक क्षमता काय आहे मनाच्या/मेंदूच्या विश्लेषणात्मक आणि सृजनात्मक अशा डाव्या आणि उजव्या बाजू समजतील IQ,EQ,AQ,CQ तसेच 8 प्रकारातील बुद्धिमत्तेत तुम्हाला नैसर्गिक प्राप्त गुणवत्ता कोठे आहे हे समजल्यास त्याला पैलू पाडणे सोपे जाते तसेच शिकण्याच्या शैलीचा व Neuron Distribution कळल्यामुळे कोणत्या विषयाची,शाखेची निवड उपयुक्त ठरेल याचे मार्गदर्शन मिळेल त्यामुळे आपला बहुमूल्य वेळ व पैसा याची बचत होईल व पाल्याला योग्य दिशा मिळेल.
4. वयोगट 25+ ◆ या वयात काही गोष्टी कमी झालेल्या असतात व नव्या गोष्टीत प्रवेश झालेला असतो यावेळी वैयक्तिक विकास व व्यावसायिक/करिअर विकास करण्यासाठी उपयोग होतो.

◆Carrier field ◆Leadership Style ◆Work Management Style ◆Suitable Department

याबद्दल मार्गदर्शन मिळेल जे यशस्वी व आनंदी आयुष्यास अत्यंत आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी आजच संपर्क करावा,

Prof. S. B. Todkar , M. E. (Design Engg.)

मो. नबंर: ९७६४९१०७४४/ ८३०८१८३६१०.

DMIT TEST | CAREER GUIDANCE | VEDIC MATHS | MID BRAIN ACTIVATION | ABACUS

SHLOK

Discover Mind and Brain

A5/303, SAHYADRI CITY, NASRAPUR,
TAL. BHOR, DIST. PUNE
Mb. No. :9764910744 shlokdmit@gmail.com
Powered by: MindTech International, Surat

MIND TECH
Make The Right Move